| MHLA140007972025 | **नियमित दिवाणी दावा : २१२/२०२५**<br>रंगनाथ दशरथ सरवदे<br>विरुध्द<br>अप्पाराव दशरथ सरवदे व इतर |
|---|---|

**निशाणी १७ खालील आदेश**

**१.** प्रतिवादी नं.१ यांनी प्रस्तुतच्या अर्जाद्वारे त्यांचे विरुध्द झालेला "No W.S." चा आदेश रद्द होवून त्यांची जवाबदावा अभिलेखावर घेणेकामी विनंती केली आहे. त्यामध्ये त्यांचे असे कथन आहे की, त्यांना महत्वाचे कागदपत्र वेळेवर न मिळाल्यामुळे जवाबदावा मुदतीत दाखल करु शकले नाहीत त्यामुळे त्यांचे विरुध्द "No W.S." चा आदेश पारीत झालेला आहे. त्यांनी झालेला विलंब हा जाणून बुजून केलेला नाही. त्यामुळे त्यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

**२.** वादीने प्रस्तुत अर्जास अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे देवून अर्जास सक्त विरोध केला आहे. त्यामध्ये त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. १ ने सदर प्रकरणात जाणुन – बुजून जवाबदावा दाखल करण्यास विलंब केला आहे. दि. २७.०३.२०२५ रोजी प्रतिवादी क्र. १ ला समन्सची बजावणी झाली आहे. सदर प्रकरणात प्रतिवादीला जवाबदावा दाखल करण्यास ३ महिने १७ दिवसांचा विलंब झाला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ चा अर्ज योग्य त्या दंडावर मंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**३.** अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अर्जाचे, प्रकरणाचे व दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १ यांना दि. २७/०३/२०२५ रोजी समन्स लागल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रस्तुत प्रतिवादी हे दिनांक ०९/०४/२०२५ रोजी वकीलांमार्फत हजर झाल्याचे तसेच त्यांना जवाबदावा दाखल करणेस विलंब झाल्याचे दिसून येत आहे. नैसर्गिक न्यायतत्वाच्या अनुषंगाने प्रतिवादीं विरुध्द झालेला "No W.S." चा आदेश रद्द करुन

दावेस त्यांना त्यांची जवाबदावा व म्हणणे दाखल करण्याची संधी देणे हे न्यायाच्या हेतूने योग्य होणार आहे. तसेच प्रस्तुतचा दावा खरेदीखत बेकायदेशिर करुन मिळणे बाबत तसेच निरंतर मनाईकरिता दाखल केला आहे. त्यामुळे दाव्याचा निकाल हा गुणदोषावर लागण्याकरीता प्रतिवादी क्र.१ चा सदरचा अर्ज मंजूर करणे हे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल. परंतु प्रतिवादी यांना जवाबदावा दाखल करणेकरीता झालेला विलंबही विचारात घ्यावा लागेल. यावरुन एकंदरीत सर्व बाजूंचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र. १ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी रक्कम रु.२००/- (दोनशे रुपये मात्र) वादीला द्यावेत.

३. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुतचा खर्च न दिल्यास तो दावा खर्चात समाविष्ट करुन घेणेत यावा.

Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2026.06.09 17:27:43 +0530

औसा
दिनांक : ०९/०६/२०२६

**(एस. डी. साबळे)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
औसा